I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर    P.S. (पोलीस ठाणे): तोफखाना    Year (वर्ष): 2026

   FIR No. (प्रथम खबर क्र.): 0245    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/04/2026 06:35 वाजता

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

   1 Day (दिवस): बुधवार    Date from (दिनांक पासून): 15/04/2026    Date To (दिनांक पर्यंत): 15/04/2026

   Time Period (कालावधी): प्रहर ६    Time From (वेळेपासून): 15:56 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:14 तास

   (b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 16/04/2026    Time (वेळ): 05:00 तास

   (c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 018    Date and Time (दिनांक आणि वेळ): 16/04/2026 06:12 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

   1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 00.00 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

   (b) Address (पत्ता): तोफखाना पोलीस स्टेशन, ता जि अहिल्यानगर ,

   (c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

   District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): अजित बाळकष्ण त्रिपुटे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1976

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-8329701344

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल अजिनाथ गोसावी | | | 1. शुभगौरी बंगला,भुषणनगर,केडगाव, Town/Village (शहर / गाव): केडगाव,अहिल्यानगर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): तोफखाना,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद दि. 16/04/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहोत. दि.14/04/2026 रोजी आम्हास तक्रारदार श्री. नितीन शांतीलाल बागले यांनी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दि. 15/04/2026 रोजी भेट घेण्याकरीता बोलविले असल्याचे कळविले. आम्ही त्यांना दि.15/04/2026 रोजी 12/00 वा. दरम्यान अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग क्र. 02 येथील दोन पंच साक्षीदार यांना दि.15/04/2026 रोजी उपलब्ध करून घेतले. पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकॉ शिंदे, पोकॉ निमसे, पोकॉ कराड, चापोहेकॉ हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 11/45 वा. निघुन 12/00 वा. दरम्यान अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. त्यानंतर तक्रारदार यांनी आमचेषी संपर्क करून ते सदर ठिकाणी त्यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम एच 14 जेई 9345 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव नितीन शांतीलाल बागले, वय 32 वर्षे धंदा खाजगी नोकरी, रा. फ्लॅट नं. 701, मॅनहॅटन सोसायटी, प्राईड वर्ल्डसीटी, चऱ्होली बु. पुणे असे सांगुन सोबत आलेले इसम हे त्यांचे वडिल श्री. शांतीलाल रामचंद्र बागले आहेत असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांची तक्रार सांगितली की, "मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. माझे व माझे कुटंबियांविरूध्द तोफखाना पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. 185/2026, बीएनएस कलम 85, 115 (2), 352, 351(2), 3 (5) प्रमाणे दिनांक 15/03/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये मला, माझे वडिल श्री. शांतीलाल बागले, आई ममता बागले, बहिण मोहिणी विशाल निकम यांना आरोपी करण्यात आले आहे. दि.31/03/2026 रोजी मला तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री. गोसावी यांनी मो.क्र. 9850819210 या नंबरवरून फोन करून माझे व कुटुंबियांचे विरूध्द तोफखाना पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगुन सदर गुन्हयाचे तपासकामी मला, माझे वडिल, आई, बहिण यांना तोफखाना पोलीस स्टेशन येथे हजर राहावे लागेल असे सांगितले. त्यानंतर दि.11/04/2026 रोजी पुन्हा गोसावी पोलीस यांचा मला फोन आला व आज तुम्हाला तोफखाना पोलीस स्टेशनला तपासकामी यावे लागेल असे म्हणाले. त्यानंतर मी, वडिल, आई, बहिण असे दि.11/04/2026 रोजी सायंकाळी साडेपाच ते सहा वाजेदरम्यान तोफखाना पोलीस स्टेशन येथे आलो. तेथे पोलीस हवालदार श्री. गोसावी यांची भेट घेतली. त्यावेळी गोसावी यांनी आम्हास सांगितले की, तुमच्या विरूध्द दाखल गुन्हयाचा तपास श्री. बाळासाहेब गिरी, पोलीस हवालदार हे करत असुन मी त्यांना मदत म्हणुन कामकाज करत आहे. तुमच्याविरूध्द दाखल गुन्हयात तुम्हाला पोलीस

स्टेशनला वारंवार चकरा माराव्या लागतील, तुम्हाला त्रास होईल, त्याकरीता तुम्ही मला 50,000/-रुपये दया. मी तुम्हाला सदर गुन्हयाच्या तपासात मदत करील व तुम्हाला वारंवार चकरा माराव्या लागणार नाहीत असे म्हणुन गोसावी यांनी माझेकडे लाचेची मागणी केली. मी त्यांना 50,000/-रूपये कशाचे, आमच्याकडे एवढे पैसे नाहीत असे म्हणालो, त्यावेळी त्यांनी मला 'तुम्हाला यात त्रास होईल, पोलीस स्टेशनला वारंवार चकरा माराव्या लागतील, तुमचे तुम्ही बघुन घ्या' असे सांगितले. आम्हाला गोसावी पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नव्हती. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन घरी आलो. दि.12/04/2026 रोजी गोसावी पोलीस यांनी माझे व्हाॅटसॲप वर नोटीस पाठविली. सदर नोटीसवर दि.11/04/2026 अषी तारीख नमुद असुन त्यामध्ये माझे कुटुंबियांना दि.15/04/2026 रोजी तोफखाना पोलीस स्टेशन येथे सकाळी 10/00 वाजता हजर राहणेबाबत नमुद केले आहे. त्यानंतर आज दि.15/04/2026 रोजी गोसावी पोलीस यांनी माझे वडिलांचे फोनवर फोन करून आम्हाला पोलीस स्टेशन येथे हजर राहण्यास सांगितले. त्यांना वडिलांनी आम्ही पोलीस स्टेशन येथे येत आहोत असे सांगितले आहे. आम्ही आज दि.15/04/2026 रोजी गोसावी पोलीस यांची तोफखाना पोलीस स्टेशन येथे भेट घेणार आहोत. त्यावेळी गोसावी यांनी आमचेकडे आमचेविरूध्द दाखल गुन्हयाच्या तपासात मदत करण्याकरीता व आम्हाला पोलीस स्टेशनच्या वारंवार चकरा माराव्या लागु नये या मोबदल्यात आमचेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व गोसावी पोलीस यांचेत कोणत्याही प्रकारचा उधारी उसणवारीचा आर्थिक व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. गोसावी यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील. आता मी गोसावी यांनी पाठविलेल्या नोटीसची छायांकित प्रत हजर करत आहे." अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री.बागले यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक गोसावी, पोलीस हवालदार यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. बागले, त्यांचे वडिल व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यांनंतर पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. बागले यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार श्री. बागले, त्यांचे वडिल शांतीलाल बागले असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकाॅर्ड केले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून ते तक्रारदार श्री. बागले यांचे गळयात कोणास दिसणार अशा प्रकारे अडकवुन दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार व त्यांचे वडिल हे पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार बागले यांच्या चारचाकी वाहनाने लोकसेवक गोसावी यांची भेट घेण्याकरीता तोफखाना पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता 13/32 वाजता रवाना केले. त्यानंतर 14/32 वाजेच्या सुमारास तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकाॅ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले.

आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक गोसावी यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी, तक्रारदार व त्यांचे वडिल असे रवाना होउन तोफखाना पोलीस स्टेषन येथे पोहोचलो. तेथे तक्रारदार यांनी एका इसमास फोन करून "सर मी पोलीस स्टेशनला आलो आहे, असे सांगतले, त्यावर समोरील व्यक्तिने कोण कोण आले आहेत, सगळे आलेत का? असे विचारले. तक्रारदार यांनी सगळे आले आहेत असे सांगितले असता समोरील व्यक्तिने ठिक आहे, आलोच असे सांगितले. थोडयाचे वेळाने तेथे एक इसम आले. त्यांना पाहुन तक्रारदार यांनी नमस्कार घातला, त्यावेळी सदर इसम हे लोकसेवक गोसावी असल्याचे मला समजले. त्यानंतर तक्रारदार, त्यांचे वडिल व लोकसेवक गोसावी यांचेत तक्रारदार यांचे व त्यांचे कुटुंबियांचे विरूध्द दाखल गुन्हयाच्या संबंधाने बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक गोसावी यांनी तक्रारदार यांना "मोबाईल हयाच्याकडे दया, व तुम्हीच या इकडे दोन मिनिटे, असे म्हणुन तक्रारदार यांना व त्यांचे वडिलांना त्यांचे सोबत कक्षाच्या बाहेर पुरूश प्रसाधनगृहाकडे घेवुन गेले व तेथे त्यांची आपआपसात चर्चा सुरू होती. मला ते बोलताना दिसत होते. थोडया वेळाने ते तिघे कार्यालयात आले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विशयी विचारले असता त्यांनी पंच नं. 1 यांनी सांगितलेल्या हकिगतीशी मिळती जुळती हकिगत सांगुन अधिकची हकीकत सांगितली की, लोकसेवक गोसावी यांनी पंच 1. यांना कार्यालयात थांबण्यास सांगुन मला व वडिलांना सोबत चालत घेवुन ते पुरूश प्रसाधनगृहाकडे गेले. आमचेत सदर ठिकाणी आमचे कामासंबंधाने चर्चा झाली. लोकसेवक गोसावी यांनी आम्हाला "त्या दिवषीचा मुद्दा क्लिअर करा, तुमचे काम मी साहेबाकडुन घेतो, मला तु एक नवा पैसा देवु नको, पाच वेळा यायची तयारी ठेव, दोन पर्याय ठेवल तुला, चैकशीला हजर राहत जा, असे म्हणाले. त्यावर मी त्यांना सुट्टया भेटत नाहीत असे म्हणालो असता गोसावी यांनी "मी पुढच्या पार्टीकडुन दोन रूपये घेवु का मग, मी फिर्यादी पार्टीच्या जवळ जात नाही, त्यांच ऐकावं लागतं, कामात जर माझ्या दुर्लक्ष वाटलं तर माझा नंबर आहे, मला बोल, असे म्हणाले. त्यावर मी त्यांना अमाउंट थोडं कमी करा असे म्हणालो असता त्यांनी "तुम्हीच बोलायचे, पोलीस स्टेशनला टप्प्यात नसतात, एक घाव दोन टुकडे, तु तिकडे, मी इकडे, परत तुला माझा फोन गुडफेथ मध्ये येईल असे म्हणाले. मी त्यांना थोडा मान ठेवा असे म्हणालो असता त्यांनी तुम्हाला जे योग्य वाटते ते सांगा असे म्हणाले. त्यावर मी पंचवीस हजार आमचे, तुम्ही सांगा असे म्हणालो असता लोकसेवक गोसावी यांनी चाळीस हजार रूपये, त्याच्यात अर्धे साहेबाला असे सांगितले. मी त्यांना पस्तीस हजार करा असे म्हणालो असता गोसावी यांनी, "करून घ्या, लगेच जमा करा, तुमच्या सहया वगैरे त्या दिवषी घेतल्यात, पेपर घेवुन साहेबाकडुन मी सहया घेवुन ठेवतो, बरका तुमचा विशय संपला, साहेबांना सांगतो की आसं आसं झालयं, त्यांना परत बोलु नका, कामाची जबाबदारी माझी, सारखं सारखं तुम्हाला इतक्या लांबुन बोलावुन घेण योग्य वाटत नाही, मला एका कामानिमित्त बाहेर जायचे आहे, मला डयुटी आहे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना लगेच आणतो, पाच दहा मिनिटे असे म्हणालो असता गोसावी यांनी जास्त वेळ लावु नका असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण तेथुन निघुन आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो, अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हाॅईस रेकाॅर्डर मधील तक्रारदार , त्यांचे वडिल व लोकसेवक

गोसावी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक गोसावी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांच्या विरूध्द दाखल गुन्हयात मदत करण्याकरीता व पोलीस स्टेशनला वारंवार चकरा माराव्या लागणार नाहीत असे सांगुन त्या मोबदल्यात 40,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 35,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले. आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 35,000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 70 भारतीय चलनी नोटा हजर केल्या.

सदर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोहेकाॅ शिंदे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, त्यांचे वडिल, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. आम्ही तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं. 1 यांना कळविले की, त्यांनी तोफखाना पोलीस स्टेशन येथे जावुन लोकसेवक गोसावी यांची भेट घ्यावी. गोसावी यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम गोसावी यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा इशारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या. पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं. 1 यांना लोकसेवक गोसावी यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 15/27 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन तोफखाना पोलीस स्टेशनचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे वाहनातुन उतरुन तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गेले. थोडयावेळाने तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं.1 असे पोलीस स्टेशनच्या बाहेर येवुन ईशारा न करता त्यांचेकडील चारचाकी वाहनात बसुन रवाना केले त्या ठिकाणी जावुन थांबले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक, पंच नं. 2 असे शासकिय वाहनाने निघुन रवाना केले त्या ठिकाणी जावुन थांबलो. पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केले.ती वेळ 15/53 वा. ची होती. आम्ही पंच नं. 1 यांना रवाना केले पासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 2 यांचे समक्ष सांगितले की, "आम्हाला रवाना केल्याप्रमाणे आम्ही रवाना होवुन तोफखाना पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे गोसावी पोलीस हजर नव्हते. तक्रारदार यांनी त्यांचे फोनचा स्पिकर चालु करून गोसावी यांना फोन केला असता त्यांनी जेवायला आलो आहे, एक तास वेळ लागेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत आलो अषी हकीकत सांगितली. त्यादरम्यान तक्रारदार यांच्या वडिलांच्या मोबाईलवर गोसावी यांचा फोन आला व त्यांनी ते पोलीस स्टेशनला आले असल्याचे सांगितले. आम्ही सर्वांना पुन्हा एकदा सर्व सुचना समाजावुन सांगितल्या. लागलीच आमचे सुचनेवरून पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्रारदार, त्यांचे वडिल व पंच नं. 1 यांना लोकसेवक गोसावी

यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 15/56 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन तोफखाना पोलीस स्टेशनचे गेटच्या बाहेर सापळा लावुन थांबलो. सदर पोलीस स्टेशन येथे येण्याकरीता दोन मार्ग असल्याने सापळा पथकातील काही कर्मचारी पोलीस स्टेशनच्या मागील बाजुस व काही समोरील बाजुस गेटच्या बाहेर सापळा लावुन थांबुन राहिले. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे तोफखाना पोलीस स्टेशनच्या गेटच्या बाहेर उभ्या केलेल्या वाहनातुन उतरुन तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गेले. थोडयाच वेळात तक्रारदार व पंच नं.1 असे गेटच्या बाहेर आले व तक्रारदार यांनी त्यांना ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 16/14 वा. दरम्यान केला. आमचे सुचनेवरून पोकाॅ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी गेटच्या बाहेरून पोलीस स्टेषनच्या समोरील पोर्च परीसरात उभ्या असलेल्या इसमाकडे बोट करून ते इसम हे "गोसावी पोलीस आहेत. आम्ही त्यांची त्यांचे कक्षात भेट घेतली. त्यावेळी त्यांनी पंच नं. 1 यांना कक्षाचे बाहेर थांबायला सांगुन मला व वडिलांना त्यांचे कक्षात बसायला सांगितले. तेथे आमचेत कामासंदर्भात चर्चा झाली. गोसावी यांनी मला एक खाकी रंगाचा लिफाफा दिला व त्यामध्ये पैसे ठेवण्यास सांगितले. त्यानंतर गोसावी हे उठुन बाहेर आले व पुरूश प्रसाधनाकडे चालत गेले. आम्हाला त्यांनी त्यांचे पाठोपाठ येण्याबाबत सांगुन मला पैसे असलेला लिफाफा प्रसाधनगृहात ठेवण्यास सांगितला व पुर्ण पैसे आहेत का असे विचारले. त्यावर मी पस्तीस पुर्ण आहेत असे सांगुन गोसावी यांनी सांगितल्याप्रमाणे प्रसाधनगृहाच्या खिडकीत सदरचा लिफाफा ठेवला. माझे वडिल सदर ठिकाणी थांबुन राहिले व मी आणि पंच नं. 1 असे गेटच्या बाहेर आलो व त्यानंतर मी लाच स्विकारलेबाबतचा ईषारा केला "असे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनमध्ये जावुन सापळा पथकाच्या मदतीने गोसावी यांना ताब्यात घेतले. गोसावी यांना त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव अनिल अजिनाथ गोसावी, वय 39 वर्षे, पोलीस हवालदार ब.नं. 1537, नेमणुक तोफखाना पोलीस स्टेशन, रा. शुभगौरी बंगला, भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर असे सांगितले. आम्ही पंच नं. 2 यांचेकरवी तोफखाना पोलीस स्टेशनमधिल पुरूष प्रसाधनगृहाच्या खिडीकत ठेवलेला लाचेच्या नोटा असलेला लिफाफा ताब्यात घेतला. सदर लिफाफयातील नोटांचे नंबर हे पुर्वी लिहिलेल्या नोटांच्या नंबराशी मिळतेजुळते आहेत याबाबत खात्री केली. त्यानंतर आम्ही गोसावी यांना ताब्यात घेवुन पुढील कामकाजाकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालयात आलो. पाठोपाठ तक्रारदार व त्यांचे वडिल ला.प्र.वि. कार्यालयात आले.ला.प्र.वि. कार्यालयात आल्यानंतर पंच नं. 2 यांचेकरवी ताब्यात घेण्यात आलेल्या लाचेच्या नोटा व लिफाफा अंधारात अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे प्रकाशात तपासुन पाहिले असता, सदर नोटांचे दोन्ही बाजुस व लिफाफयाचे आतील बाजुस व तोंडास अॅन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटोग्राफ्स घेण्यात आले. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दिनांक 15/04/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 13/32 ते 14/32 वाजेच्या दरम्यान तोफखाना पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर

येथे लोकसेवक गोसावी, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार श्री. बागले यांचेकडे त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांच्या विरूध्द दाखल गुन्हयात मदत करण्याकरीता व पोलीस स्टेशनला वारंवार चकरा माराव्या लागणार नाहीत असे सांगुन त्या मोबदल्यात 40,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 35,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व दिनांक 15/04/2026 रोजी 15/56 ते 16/14 वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक गोसावी यांनी तक्रारदार यांना 35,000/-रु. लाचेची रक्कम ठेवण्यास खाकी रंगाचा लिफाफा देवुन सदर रक्कम लिफाफयात टाकुन सदरचा लिफाफा तोफखाना पोलीस स्टेशनमधिल पुरूष प्रसाधनगृहाच्या खिडकीत ठेवण्यास सांगुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन यातील लोकसेवक अनिल अजिनाथ गोसावी, वय 39 वर्षे, पोलीस हवालदार ब.नं. 1537, नेमणुक तोफखाना पोलीस स्टेशन, रा. शुभगौरी बंगला, भुषणनगर, केडगाव, अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

दाखल अमलदार -- पोहेकॉ/गंगावणे

तपासी अमलदार --पोलीस निरीक्षक आल्हाट ला प्र वि अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Jagdish Chhaburao Bhambal (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) Directed (Name of I.O.) **(तपास अधिका-याचे नाव):** Rank **(हुद्दा):**

No. **(क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार
तोफखाना पो. स्टेशन
अहिल्यानगर

Name (नाव): Jagdish Chhaburao Bhambal

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):